महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालय

(पुरवठा शाखा)

दुरध्वनी क्रमांक:-०२३५२/२२२४१२ ई-मेल –dso_ratnagiri@rediffmail.com

---

क्र/पुरवठा-१/ग्रा.सं.प/जाहिरात/२०२० दिनांक : २१/०१/२०२१

---

## रत्नागिरी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याकरिता अर्ज मागविण्यासाठी जाहिरात

ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम ७ व ८ नुसार ग्राहकांच्या अधिकारांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जिल्हा स्तरावर ग्राहक संरक्षण परिषद गठीत करणेची आहे. यापूर्वी क्र.पुरवठा-१/जिग्रासंप/०१/२०१८ दिनांक ३०/०१/२०१८ च्या आदेशाने गठीत केलेल्या ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांचा ३ वर्षांचा कार्यकाल दिनांक २९/०१/२०२१ रोजी पूर्ण होत असल्याने सदर समितीवरील अशासकीय सदस्यांच्या पुढील ३ वर्षाच्या कालावधीसाठी नव्याने निवड करण्याची कार्यवाही करावयाची आहे. निवड करावयाचे प्रवर्गनिहाय अशासकीय सदस्यांची संख्या, निकष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | प्रवर्ग | संख्या | निकष |
|---|---|---|---|
| १ | अशासकीय सदस्यांचे प्रतिनिधी | १० | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्र.ग्राराप-१०१३/ प्र.क्र.११९/ ग्रासं-२ दिनांक १९ ऑक्टोबर, २०१३ चे अवलोकन करावे. |
| २ | जिल्हा परिषद सदस्य | ०२ | |
| ३ | नगर परिषद सदस्य | ०२ | |
| ४ | पंचायत समिती सदस्य | ०२ | |
| ५ | कृषि उत्पन्न बाजार समिती सदस्य | ०२ | |
| ६ | शाळा/महाविद्यालयाचे प्रतिनिधी | ०२ | |
| ७ | वैद्यक व्यवसाय | ०२ | |
| ८ | व्यापार व उद्योग क्षेत्र | ०२ | |
| ९ | पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे प्रतिनिधी | ०२ | |
| १० | शेतकरी प्रतिनिधी | ०२ | |
| | एकूण | २८ | |

सदर जाहिरात, त्याबाबतचे शासन निर्णय, परिशिष्ट-अ मधील अर्जाचा विहित नमुना, परिशिष्ट-ब मधील सोबत जोडावयाचे कागदपत्रांची सूची या सर्व बाबी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे www.ratnagiri.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आल्या आहेत. त्यामुळे अर्जाचा नमुना सदर संकेतस्थळावरुन उपलब्ध होईल किंवा जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी (पुरवठा शाखा) यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

इच्छुक संस्था/पदाधिकारी, व्यक्ती यांनी अर्ज दाखल करण्यापूर्वी याबाबतचे शासन निर्णय, अधिसूचना वा तत्संबंधीचे सर्व सूचना पत्रांचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

याप्रमाणे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य म्हणून काम करण्यांस इच्छुक असणारे संस्था/पदाधिकारी, व्यक्ती यांनी परिशिष्ट-अ मधील विहीत नमुन्यात परिशिष्ट-ब मध्ये दिलेल्या कागदपत्रांचे साक्षांकित

केलेल्या सत्यप्रतीसह आपले लेखी अर्ज ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत दाखल होतील अशा पध्दतीने जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी (पुरवठा शाखा) येथे दाखल करावेत. मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

स्थळ-रत्नागिरी

दिनांक- २१/०१/२०२१

(लक्ष्मीनारायण मिश्रा)

जिल्हाधिकारी रत्नागिरी

राज्य/जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांवर
अशासकीय सदस्यांची नियुक्ती.

# महाराष्ट्र शासन
## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
## शासन निर्णय क्रमांकः ग्राराप-१०१३/प्र.क्र.११९/ग्रासं-२,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १९ ऑक्टोबर, २०१३

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांकः जिग्राप १००३/७८८/प्र.क्र.८८७/ग्रासं-२,दि. २२ ऑक्टोबर, २००३.
२) शासन अधिसूचना क्रमांकः ग्रासंक २५०४/प्र.क्र.२९५१/ग्रासं-३, दि. २२ मार्च, २००५.
३) शासन अधिसूचना क्रमांकः ग्रासंप २००७/२१२८/प्र.क्र.१३४७/ग्रासं-२, दि.६ ऑगस्ट, २००९.
४) शासन पत्र क्रमांकः जिग्राप १४१०/प्र.क्र.९२/ग्रासं-२, दि. २ ऑगस्ट, २०१०
५) शासन अधिसूचना क्रमांकः जिग्राप १४१०/प्र.क्र.९२/ग्रासं-२, दि. ९ ऑक्टोबर, २०१२.
६) शासन अधिसूचना क्रमांकः जिग्राप-१४१०/प्र.क्र.९२/पुनर्बांधणी-५/ग्रासं-२,दि. १०. १२.२०१२.
७) शासन अधिसूचना क्रमांकः ग्रासंप २०१३/प्र.क्र.२३/ग्रासं-२, दिनांक ९ एप्रिल, २०१३.

प्रस्तावना :

ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ च्या कलम ७ व ८ नुसार ग्राहकांच्या अधिकारांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी राज्य स्तरावर राज्य ग्राहक संरक्षण परिषद व जिल्हा स्तरावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदा स्थापन करणे आवश्यक आहे. सदर परिषदांमध्ये करावयाचे काम परिणामकारक होण्यासाठी त्या परिषदांवर शासकीय व अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याची तरतूद आहे.

उक्त अधिनियमाच्या अनुषंगाने राज्य व जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांवर शासकीय व अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्यांच्या संदर्भात महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (सुधारणा) नियम,२००५, (सुधारणा) नियम, २००९, (सुधारणा) नियम,२०१२ व (सुधारणा) नियम,२०१३ वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये उक्त परिषदांवर करावयाच्या शासकीय व अशासकीय सदस्यांची संख्या व प्रवर्ग निश्चित करण्यात आलेले आहेत. तथापि अशासकीय सदस्यांच्या निवडीचे निकष व कार्यपध्दती अधिक सविस्तर व पारदर्शक करणे आवश्यक झाले आहे.

राज्य/जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांचे तात्काळ गठन करावयाचे काम सुरु करण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१५६/२०११ व क्र.१३३/२०१२ दाखल करण्यात आलेल्या आहेत. या याचिकांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक २९ जुलै,२०१३ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये उक्त परिषदांवर करावयाच्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीबाबत निकष विहित करणे. तसेच राज्य व जिल्हा स्तरावरील ग्राहक संरक्षण परिषदांवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीसाठी अनुक्रमे प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग व संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याचे निदेश दिले आहेत. त्यानुसार शासन निर्णयाचे प्रारुप दिनांक २८ ऑगस्ट, २०१३ च्या प्रतिज्ञापत्राद्वारे मा. उच्च न्यायालयाच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आले.

त्या अनुषंगाने दिनांक २७ सप्टेंबर, २०१३ रोजी सुनावणी झाली. त्यावेळी प्रारुप शासन निर्णयामध्ये ग्राहक संरक्षण परिषदांवर महिलांना प्रतिनिधित्व देण्याची सूचना मा. उच्च न्यायालयाने केली.

राज्य शासनाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व मा. उच्च न्यायालयाचे वरील निदेश/सूचना विचारात घेऊन राज्य/जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांवरील अशासकीय सदस्य म्हणून व्यक्ती/संस्थांची निवड अधिक पारदर्शकपणे व सविस्तर होण्यासाठी अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी निकष व कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

## शासन निर्णय :

**राज्य ग्राहक संरक्षण परिषद** :-

१. **राज्य परिषदेची उद्दीष्टे** - ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ मधील कलम ८ खाली विहित केल्याप्रमाणे राज्यात ग्राहकांच्या हक्कांचे संवर्धन व संरक्षण करणे.

२. **राज्य ग्राहक संरक्षण परिषदेतील अशासकीय सदस्य** - वरील संदर्भीय दिनांक ६ ऑगस्ट, २००९ च्या अधिसूचनेनुसार **राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवर** खालीलप्रमाणे अशासकीय सदस्यांची प्रवर्गनिहाय संख्या निश्चित करण्यात आलेली आहे:-

(क) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले, ग्राहक संघटनांचे **सहापेक्षा अधिक नसतील इतके** प्रतिनिधी.

(ख) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या, ग्राहकांच्या हिताशी संबंधित **पाच पेक्षा अधिक नसतील** इतक्या व्यक्ती.

(ग) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले शेतकरी, व्यापार व उद्योग क्षेत्रातील **प्रत्येकी एक पेक्षा अधिक नसतील** इतके प्रतिनिधी.

३. **निवडसमिती** -

(अ) राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांची निवड करण्यासाठी खालील समिती गठित करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव /सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | - अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव/सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | - सदस्य |
| ३. | अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांनी नामनिर्देशित केलेले आयोगाचे एक सदस्य | - सदस्य |
| ४. | उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | - निमंत्रक |

(ब) समितीने परि. ४ येथील निकष विचारात घेऊन अशासकीय सदस्यांची निवड करावी. तसे करताना राज्यातील प्रत्येक महसूल विभागातून संस्था व व्यक्तींची परि. २ (क) मधील एक संस्था व परि. २ (ख) व (ग) मधील व्यक्तींपैकी किमान एक व्यक्तीची निवड करावी.

(क) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ मधील कलम 7(२)(क) मधील तरतुदीनुसार राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवर १० शासकीय किंवा अशासकीय सदस्य केंद्र शासनाने नियुक्त

करावयाचे आहेत. त्यासाठी केंद्र शासनाने अशासकीय सदस्यांची नावे उपलब्ध करुन देण्याची विनंती केल्यास, प्राप्त झालेल्या अर्जांमधून निवड करण्यात आलेल्या उमेदवारांचे अर्ज वगळून उर्वरित अर्जांमधून अशा सदस्यांची समिती निवड करेल व निवड झालेल्या उमेदवारांची शिफारस केंद्र शासनाकडे करण्यात येईल.

४. **पात्रतेचे निकष** - राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशा अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या खालील निकषांच्या आधारे करण्यात याव्यात.

**(अ) ग्राहक संघटनांचे /संस्थांचे प्रतिनिधी (सहा) :-**

(१) या प्रतिनिधींच्या निवडीसाठी देण्यात आलेल्या जाहिरातीच्या दिनांकापूर्वी संस्थेने ग्राहक जनजागृतीसाठी महाराष्ट्रात सलग ५ वर्षे प्रशंसनीय काम केलेले असावे व संस्था लौकिकवान (Reputed) असावी.

(२) ग्राहकांच्या समस्यांसंदर्भात संस्थेने सर्वेक्षण व संशोधनात्मक कार्य केलेले असावे.

(३) संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत असावी.

(४) संस्था जात, धर्म, वंश किंवा रंग असा भेदभाव न करता जनतेच्या सेवेसाठी ग्राहक चळवळीत कार्यरत असावी.

(५) ग्राहकांच्या हिताची जपवणूक करणे व जागृती निर्माण करणे हे उद्दिष्ट संस्थेच्या घटनेत स्पष्टपणे अंतर्भूत असावे.

(६) सारखेच हितसंबंध असणा-या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकत्रितपणे कार्य केलेले असावे.

(७) संस्थेने ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण व ग्राहक चळवळ या संबंधात प्रशिक्षण, प्रबोधन, प्रचार, प्रसार, प्रसिध्दी इत्यादीद्वारे राज्यातील किमान दोन जिल्हयांच्या कार्यक्षेत्रात काम केलेले असावे.

(८) संस्थेने ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ व त्या अंतर्गत करण्यात आलेल्या नियमांची माहिती ग्राहकांना करुन देण्यासाठी काम केलेले असावे.

(९) संस्थेच्या प्रतिनिधीला मराठीचे व किमान इतर एका भाषेचे उत्तम ज्ञान असावे.

(१०) संस्था राजकीय/शासकीय/सांप्रदायिक तसेच स्वामीत्व मालकीची (Proprietary) नसावी.

(११) संस्था ही नफा मिळविण्याच्या उद्देशाने कार्यरत नसावी.

(१२) संस्थेला अस्तित्वात आल्यापासून ग्राहक कल्याण कार्यक्रम राबविण्याबाबत केंद्र शासन किंवा राज्य शासनाने कधीही अपात्र ठरविलेले नसावे.

(१३) संस्था व संस्थेच्या कोणत्याही प्रतिनिधीविरुध्द गैरवर्तणुकीसंदर्भात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

(१४) संस्था व संस्थेच्या कोणत्याही प्रतिनिधीने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(१५) संस्था आणि संस्थेमार्फत प्रस्तावित केलेला प्रतिनिधी शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

**(ब) <u>ग्राहक हिताशी संबंधित व्यक्ती (पाच)</u> :-**

(१) या व्यक्तिंच्या निवडीसाठी देण्यात आलेल्या जाहिरातीच्या दिनांकापूर्वी त्या व्यक्तिंनी ग्राहक जनजागृतीसाठी महाराष्ट्रात सलग ५ वर्षे काम केलेले असावे (उदा. प्रशिक्षण, प्रबोधन, प्रचार, प्रसार, प्रसिध्दी, इ.) व ती व्यक्ती लौकिकवान (Reputed) असावी.

(२) त्या व्यक्तिने ग्राहकांच्या समस्यांसंदर्भात सर्वेक्षण व संशोधनाचे काम केलेले असावे.

(३) सारखेच हितसंबंध असणा-या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकत्रितपणे त्यांनी कार्य केलेले असावे.

(४) ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण व ग्राहक चळवळ या संबंधात राज्यातील किमान दोन जिल्हयांच्या कार्यक्षेत्रात वैयक्तिकरित्या/संघटनात्मक काम केलेले असावे.

(५) ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ व त्या अंतर्गत करण्यात आलेल्या नियमांची माहिती ग्राहकांना करुन देण्यासाठी त्यांनी काम केलेले असावे.

(६) ग्राहक संरक्षण कार्यासंबंधी यापूर्वी पुरस्कार/सन्मान मिळालेला असावा.

(७) त्या व्यक्तिस <u>मराठीचे व किमान इतर एका भाषेचे उत्तम ज्ञान</u> असावे.

(८) त्या व्यक्तिला गैरवर्तणुकीसंदर्भात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

(९) त्या व्यक्तिने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(१०) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

**(क) शेतकरी प्रतिनिधी (एक) :-**

(१) स्वत: शेती करणारा असावा. (शेतकरी असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.)

(२) ग्राहक म्हणून शेतक-याची फसवणूक होऊ नये यासाठी शेतक-यांच्या जागृतीचे काम केलेले असावे.

(३) शेतक-यांना बी-बियाणे, खते, औषधे, औजारे, पीक वीमा, कर्ज इत्यादी मिळावे यासाठी चांगल्या गुणवत्तेचे काम केलेले असावे.

(४) एकसारखे ग्राहक हितसंबंध असणा-या अनेक शेतक-यांच्या तक्रारी/समस्यांचे निवारण करण्याकरिता काम केलेले असावे.

(५) गैरवर्तणुकीसंदर्भात खटला दाखल होऊन त्यांना शिक्षा झालेली नसावी.

(६) त्याने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(७) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

**(ड) व्यापार व उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी (प्रत्येकी एक):-**

(१) स्वत: व्यापारी/उद्योजक असावा. (याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.)

(२) व्यापारी व उद्योजकांकडून ग्राहकांना चांगल्या गुणवत्तेचा माल उपलब्ध होण्यासाठी व्यापारी/उद्योजकांमध्ये जागृती, प्रचार व प्रसार केलेला असावा.

(३) गैरवर्तणुकीसंदर्भात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

(४) त्याने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(५) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

**५. राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीबाबतची कार्यपध्दती:-**

(१) राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीकरिता परि. २ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक प्रवर्गातील इच्छुक संस्था व व्यक्तींकडून अर्ज मागविण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने राज्य स्तरावरील किमान एक (शासकीय यादीवरील प्रतिष्ठित वृत्तपत्रात) इंग्रजी व मराठी दैनिकामध्ये जाहिरात द्यावी.

(२) वृत्तपत्रांतील जाहिरातीव्यतिरिक्त विभागाच्या संकेतस्थळावर देखील याबाबतची माहिती देण्यात यावी.

(३) संबंधितांकडून **परिशिष्ट-अ** येथील नमुन्यात अर्ज मागविण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात यावी.

(४) अर्जासोबत **परिशिष्ट - ब** मध्ये नमूद केलेल्या मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे आवश्यक राहील. असे साक्षांकन केंद्र/राज्य शासनाच्या राजपत्रित अधिका-याने करणे आवश्यक आहे. साक्षांकित केलेल्या प्रती जोडल्या नसल्यास सदरचा अर्ज अपात्र ठरविण्यात यावा.

(५) राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्याची निवड करण्यासाठी परिच्छेद ३ मध्ये गठित करण्यात आलेल्या निवड समितीने प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन निवड केलेल्या उमेदवारांची शासनास शिफारस करावी. राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांची निवड करतांना याकरीता जे निकष विहित करण्यात आलेले आहेत, त्या निकषांपैकी जास्तीत जास्त निकषांची पूर्तता करणा-या उमेदवाराची प्राथम्याने निवड करावी. निवड समितीच्या अशा शिफारशीप्रमाणेच अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचे आदेश शासनाने निर्गमित करावे.

(६) राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवर जाहिरात देऊन एखाद्या प्रवर्गात आवश्यक अर्ज प्राप्त न झाल्यास उर्वरित अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी पुन्हा एकदा जाहिरात देण्यात यावी. त्यानंतर वरीलप्रमाणे निवड प्रक्रिया पूर्ण करावी.

(७) राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील एकूण अशासकीय सदस्यांच्या संख्येच्या किमान २० टक्के महिलांना प्रतिनिधित्व मिळेल, याची दक्षता निवड समितीने घेऊन त्याप्रमाणे

महिला सदस्यांची निवड करुन त्यांच्या नावाची शिफारस शासनास करावी. निवड समितीच्या शिफारशीनुसार वरीलप्रमाणे शासनाने महिला सदस्यांची नियुक्ती करावी.

<u>जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद</u>

६. **जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची उद्दीष्टे**- ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ मधील कलम ८-ब अन्वये विहित केल्याप्रमाणे जिल्हयात ग्राहकांच्या हक्कांचे संवर्धन व संरक्षण करणे.

७. **जिल्हा ग्राहक परिषदेवरील अशासकीय सदस्य** - वरील संदर्भीय दिनांक २२ मार्च, २००५ व ९ ऑक्टोबर, २०१२ च्या अधिसूचना व दिनांक २ ऑगस्ट, २०१० च्या आदेशान्वये जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर प्रवर्गनिहाय खालील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

(क) जिल्हा परिषदेचे **दोन पेक्षा कमी** नसतील इतके सदस्य,

(ख) महानगरपालिका/नगरपरिषदांचे **दोन पेक्षा कमी** नसतील इतके सदस्य,

(ग) पंचायत समितीचे **दोन पेक्षा कमी** नसतील इतके सदस्य,

(घ) कृषि उत्पन्न बाजार समितीचे **दोन पेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी,

(ङ) ग्राहक संघटनांचे **दहापेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी**

(च) शाळा/महाविद्यालये यांचे **दोनपेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

(छ) वैद्यक व्यवसायांचे **दोनपेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

(ज) व्यापार व उद्योग क्षेत्राचे **दोनपेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

(झ) पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे **दोनपेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

(ञ) शेतक-यांचे **दोनपेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी.

८. **निवड समिती** --

(अ) जिल्हा स्तरावरील **जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील** अशासकीय सदस्यांच्या निवडीसाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून) | - अध्यक्ष |
| संबंधित जिल्हयाचे पोलीस अधीक्षक | - सदस्य |
| जिल्हा ग्राहक मंचाचे अध्यक्ष | - सदस्य |
| संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून) | - निमंत्रक |

(ब) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांवर अशासकीय सदस्यांची निवड वरील निवड समितीमार्फत करण्यात येईल. निवड झालेल्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचे आदेश जिल्हाधिकारी यांनी निर्गमित करावेत.

९. **निवडीचे निकष** - जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती खालील निकषांच्या आधारे करण्यात यावी:-

**अ) अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी (दहा) :-**

(१) या प्रतिनिधींच्या निवडीसाठी देण्यात आलेल्या जाहिरातीच्या दिनांकापुर्वी संस्थेने ग्राहक जनजागृतीसाठी संबंधित जिल्हयात सलग ५ वर्षे काम केलेले असावे व संस्था लौकिकवान (Reputed) असावी.

(२) संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत संस्था नोंदणीकृत असावी.

(३) ग्राहकांच्या समस्यांसंदर्भात संस्थेने सर्वेक्षण व संशोधनाचे कार्य केलेले असावे.

(४) संस्था राजकीय/शासकीय/सांप्रदायिक तसेच स्वामीत्व मालकीची (Proprietary) नसावी.

(५) संस्था जात, धर्म, वंश, रंग असा भेदभाव न करता जनतेच्या सेवेसाठी ग्राहक चळवळीत कार्यरत असावी.

(६) संस्था ही नफा मिळविण्याच्या उद्देशाने कार्यरत नसावी.

(७) ग्राहकांच्या हिताची जपवणूक करणे व जागृती निर्माण करणे हे उद्दिष्ट संस्थेच्या घटनेत स्पष्टपणे असावे.

(८) संस्थेला ग्राहक कल्याण कार्यक्रम राबविण्याबाबत केंद्र शासन किंवा राज्य शासनाने संस्था अस्तित्वात आल्यापासून कधीही अपात्र ठरविले नसावे.

(९) संस्था व संस्थेच्या कोणत्याही प्रतिनिधीविरुध्द गैरवर्तणुकीसंदर्भात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

(१०) संस्था व संस्थेच्या कोणत्याही प्रतिनिधीने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(११) सारखेच हितसंबंध असणा-या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकत्रितपणे कार्य केलेले असावे.

(१२) संस्थेने ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण व ग्राहक चळवळ या संबंधात प्रशिक्षण, प्रबोधन, प्रचार, प्रसार, प्रसिध्दी इत्यादीद्वारे जिल्हयांच्या कार्यक्षेत्रात काम केलेले असावे.

(१३) संस्थेने ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ व त्या अंतर्गत करण्यात आलेल्या नियमांची माहिती ग्राहकांना करुन देण्यासाठी काम केलेले असावे.

(१४) संस्थेच्या प्रतिनिधीला मराठी भाषेचे उत्तम ज्ञान असावे.

(१५) संस्था आणि संस्थेमार्फत प्रस्तावित केलेला प्रतिनिधी शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

**ब) जिल्हा परिषदेचे (दोन), महानगरपालिका/नगरपरिषदांचे (दोन), पंचायत समितीचे (दोन), कृषि उत्पन्न बाजार समितीचे (दोन) व शाळा/महाविद्यालयांचे (प्रत्येकी एक), या प्रवर्गातील अशासकीय सदस्यांसाठी** -

१) ग्राहक जनजागृतीसाठी जिल्हयात काम केलेले असावे. (उदा. प्रशिक्षण, प्रचार, प्रसार, प्रबोधन, प्रसिध्दी, इ.)

२) सारखेच हित संबंध असणा-या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी एकत्रितपणे काम केलेले असावे.

३) ग्राहकांच्या समस्यांसंदर्भात सर्वेक्षण व संशोधनाचे कार्य केलेले असावे.

४) सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

५) गैरवर्तणुकीसंदर्भात न्यायालयात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

**क) वैद्यक व्यवसायाचे (दोन), व्यापार व उद्योग क्षेत्राचे (प्रत्येकी एक), पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे (प्रत्येकी एक) -**

(१) ग्राहकांना चांगल्या गुणवत्तेची सेवा / माल उपलब्ध होण्यासाठी जागृती, प्रचार व प्रसार केलेला असावा.

(२) ग्राहकांच्या समस्यांसंदर्भात संस्थेने सर्वेक्षण व संशोधनात्मक कार्य केलेले असावे.

(३) सारखेच हितसंबंध असणा-या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकत्रितपणे कार्य केलेले असावे.

(४) ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण व ग्राहक चळवळ या संबंधात प्रशिक्षण, प्रबोधन, प्रचार, प्रसार, प्रसिध्दी इत्यादीद्वारे काम केलेले असावे.

(५) मराठीचे व किमान इतर एका भाषेचे उत्तम ज्ञान असावे.

(६) गैरवर्तणुकीसंदर्भात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

(७) सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(८) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

**ड) शेतकरी प्रतिनिधी (दोन) :-**

(१) स्वत: शेती करणारा असावा.

(२) ग्राहक म्हणून शेतक-यांची फसवणूक होऊ नये यासाठी शेतक-यांच्या जागृतीचे काम केलेले असावे.

(३) शेतक-यांना चांगल्या गुणवत्तेचे बी-बियाणे, खते, औषधे मिळण्यासाठी काम केलेले असावे.

(४) एकसारखे हितसंबंध असणा-या अनेक शेतक-यांच्या तक्रारी/समस्यांचे निवारण करण्याकरिता काम केलेले असावे.

(५) गैरवर्तणुकीसंदर्भात खटला किंवा शिक्षा झालेली नसावी.

(६) सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(७) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

१०. **जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीबाबतची कार्यपध्दती:-**

(१) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील परि. ७ मधील प्रवर्गातील अशासकीय सदस्यांच्या निवडीसाठी संस्थांचे इच्छुक प्रतिनिधी व व्यक्तींकडून अर्ज मागविण्याकरिता संबंधित जिल्हाधिका-यांनी आपल्या जिल्हयामध्ये शासनमान्य सर्वाधिक खप असलेल्या किमान एका मराठी वृत्तपत्रामध्ये जाहिरात द्यावी.

(२) वृत्तपत्रांतील जाहिरातीव्यतिरिक्त संबंधित जिल्हाधिकारी यांच्या संकेतस्थळावर देखील याबाबतची माहिती देण्यात यावी.

(३) परि. ७ मधील प्रवर्गातील संस्था व व्यक्तींकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात यावी.

(४) अर्जासोबत परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे आवश्यक राहील. असे साक्षांकन केंद्र/राज्य शासनाच्या राजपत्रित अधिका-याने करणे आवश्यक आहे. साक्षांकित केलेल्या प्रती जोडल्या नसल्यास सदरचा अर्ज अपात्र ठरविण्यात यावा.

(५) समितीने परिच्छेद ९ मधील निकष विचारात घेऊन जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर जिल्हयातील वेगवेगळया भागातील संस्था व व्यक्ती यांना संधी मिळेल ही बाब पण लक्षात ठेवावी.

(६) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर संबंधित प्रवर्गातून आवश्यक अर्ज प्राप्त न झाल्यास उर्वरित अशासकीय सदस्यांची निवड करण्यासाठी संबंधित जिल्हाधिका-यांनी पुन्हा एकदा जाहिरात देऊन विहित कार्यपध्दती अनुसरुन उर्वरित अशासकीय सदस्यांची निवड करावी.

(७) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी दोन वेळा जाहिरात देऊन सुध्दा अर्ज प्राप्त न झाल्यास संबंधित प्रवर्गातील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी जिल्हाधिकारी / नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी अशा प्रवर्गातील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या करण्यासाठी परि. १०(अ), १०(ब) व १०(क) मध्ये विहीत केलेली कार्यपध्दती अनुसरावी.

(८) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील एकूण अशासकीय सदस्यांच्या संख्येच्या किमान २० टक्के महिलांना प्रतिनिधित्व मिळेल, याची दक्षता जिल्हा निवड समितीने घेऊन त्याप्रमाणे महिला सदस्यांची निवड करुन त्यांच्या नावाची शिफारस जिल्हाधिका-यांस करावी. जिल्हा निवड समितीच्या शिफारशीनुसार वरीलप्रमाणे जिल्हाधिका-यांनी महिला सदस्यांची नियुक्ती करावी.

**१०. अ) परिच्छेद ७(क), (ख), (ग), (घ), (झ) या प्रवर्गातील अशासकीय प्रतिनिधींसाठी :-**

१) संबंधित प्रवर्गात आपल्या जिल्हयात/कार्यक्षेत्रात असलेल्या सदस्यांची यादी जिल्हाधिकारी / नियंत्रक, शिधावाटप यांनी तयार करावी. त्यांच्यापैकी इच्छुक असलेल्या प्रतिनिधींकडून अर्ज मागवावे.

२) अर्ज प्राप्त न झाल्यास या यादीतील वयाने जेष्ठ असलेल्या व खालील अट क्र. ३ ते ५ ची पूर्तता करणा-या एक पुरुष व एक महिला सदस्यांची नियुक्ती करावी.

३) त्यांनी ग्राहकांच्या हिताकरिता काम केलेले असावे / काम करण्याची त्यांची तयारी असावी.

४) गैरवर्तणुकीबाबत खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

५) सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

**१०. ब) शाळा व महाविद्यालयातील प्रतिनिधी (दोन) :-**

१) जिल्हयातील उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांमधून एक व महाविद्यालयातून एक प्रतिनिधीची निवड करण्यात यावी. असे करतांना या प्रवर्गातून एक महिला व एक पुरुष सदस्याची निवड करावी.

२) जिल्हयात ज्या उच्च माध्यमिक शाळेत व महाविद्यालयात विद्यार्थी संख्या सर्वात अधिक आहे अशा शाळेच्या मुख्याध्यापकाची व महाविद्यालयाच्या प्राचार्यांची निवड करण्यात यावी.

**१०. क) वैद्यकीय व्यवसायाचे प्रतिनिधी (दोन):-**

जिल्हयात ज्या खाजगी रुग्णालयात रुग्णांच्या सेवेसाठी जास्तीत जास्त खाटांची सुविधा तसेच विविध आजारांच्या/रोगांच्या तपासणीच्या व्यापक सुविधा आहेत, अशा रुग्णालयातील वैद्यकीय व्यवसायाच्या नामवंत अशा एक महिला व एक पुरुष सदस्याची निवड करावी.

**मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयासाठी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद** -

११. **जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची उद्दीष्टे** - ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ मधील कलम ८-ब खाली विहित केल्याप्रमाणे जिल्ह्यात ग्राहकांच्या हक्कांचे संवर्धन व संरक्षण करणे.

१२. **जिल्हा ग्राहक परिषदेवरील अशासकीय सदस्य**-वरील संदर्भीय दिनांक २२ मार्च, २००५ व ९ ऑक्टोबर, २०१२ च्या अधिसूचना व दिनांक २ ऑगस्ट, २०१० च्या आदेशान्वये नियंत्रक शिधावाटप यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर खालील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

(क) महानगरपालिकेचे **आठ पेक्षा कमी नसतील** इतके सदस्य,

(ख) कृषि उत्पन्न बाजार समितीचे **दोन पेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

(ग) ग्राहक संघटनांचे **दहापेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी

(घ) शाळा/महाविद्यालये यांचे **दोनपेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

(च) वैद्यक व्यवसायांचे **दोनपेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

(छ) व्यापार व उद्योग क्षेत्राचे **दोनपेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

(ज) पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे **दोनपेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

१३. **निवड समिती** -

(अ) नियंत्रक शिधावाटप यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीसाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयासाठी) | - अध्यक्ष |
| २. | नियंत्रक, शिधावाटप क्षेत्राकरिता पोलीस आयुक्त, मुंबई यांनी नामनिर्देशित केलेला एक पोलीस उपायुक्त. | - सदस्य |
| ३. | मुंबई उपनगर जिल्हा ग्राहक मंचाचे अध्यक्ष | - सदस्य |
| ४. | संबंधित उप नियंत्रक, शिधावाटप (मुख्यालय), नियंत्रक शिधावाटप कार्यालय, मुंबई. | - निमंत्रक |

(ब) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांवर अशासकीय सदस्यांची निवड वरील निवड समितीमार्फत करण्यात यावी व निवड झालेल्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचे आदेश नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांनी निर्गमित करावेत.

१४. **पात्रतेचे निकष** -

परि. ९ मध्ये विविध प्रवर्गासाठी विहित केलेल्या निकषांच्या आधारे अशासकीय सदस्यांची निवड करण्यात यावी.

१५. **निवडीबाबतची कार्यपध्दती-**

परिच्छेद १० मध्ये विविध प्रवर्गासाठी विहित केलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी व निवड झालेल्या उमेदवारांचे आदेश नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांनी निर्गमित करावेत.

१६. **नैमित्तिक रिक्त पद भरणे** :-

राज्य/जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्याचे पद मृत्यु, राजीनामा, इ. कारणास्तव रिक्त झाल्यास ते पद यापूर्वी प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करुन पात्र अर्जदारांमधून यथास्थिती राज्य /जिल्हा स्तरावरील निवड समितीच्या शिफारशीनुसार शासन /जिल्हाधिकारी यांच्याकडून शक्य तितक्या लवकर भरण्यात येईल. त्या रिक्त पदावर निवड केलेली व्यक्ती ज्या व्यक्तीच्या जागी तिची नियुक्ती झाली असेल त्या व्यक्तीच्या उर्वरित पदावधीकरिता ते पद धारण करील.

१७. सदर आदेश विचारात घेऊन राज्य/जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीबाबतची कार्यवाही विनाविलंब सुरु करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१०१९१६०२५२६३०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uddhav Dattatraya Walunj

Digitally signed by Uddhav Dattatraya Walunj
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=FCSCP, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Uddhav Dattatraya Walunj
Date: 2013.10.19 16:16:46 +05'30'

**(उ. द. वाळुंज)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद
२. सर्व मा. विधानसभा/ विधान परिषद सदस्य
३. राज्यपालांचे सचिव
४. मुख्यमंत्र्यांचे सचिव
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
७. पोलीस महासंचालक, मुंबई
८. सर्व पोलीस आयुक्त.
९. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
१०. मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई, औरंगाबाद, नागपूर
१४. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मूळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१५. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१६. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१८. सर्व विभागीय आयुक्त
१९. सर्व महानगरपालिका आयुक्त
२०. सर्व जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी

२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२२. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी /अन्नधान्य वितरण अधिकारी
२३. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपालिका
२४. प्रबंधक, राज्य आयोग
२५. प्रबंधक सर्व जिल्हा मंच
२६. अध्यक्ष महाराष्ट्र विद्युत महामंडळ, मुंबई.
२७. मुख्य व्यवस्थापक, भारत संचार निगम लि. मुंबई.
२८. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई.
२९. सर्व आयुक्त, महानगरपालिका
३०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपालिका
३१. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी
३२. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
३३. परिवहन आयुक्त, मुंबई
३४. सर्व मंत्रालयीन विभाग
३५. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
३६. सह सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
३७. सर्व उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
३८. सर्व कार्यासने, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
३९. निवड नस्ती (ग्रासं.२)

फोटो

# परिशिष्ट —अ

**राज्य ग्राहक संरक्षण परिषद / जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील नियुक्तीसाठी करावयाच्या अर्जाचा नमूना —**

(१) संस्थेचे/अर्जदाराचे पूर्ण नांव -
(२) पूर्ण पत्ता -
(३) संस्थेचा प्रतिनिधी म्हणून ज्या व्यक्तीस नामनिर्देशित करावयाचे आहे त्या व्यक्तीचे नाव व पत्ता –
दूरध्वनी क्रमांक
भ्रमणध्वनी क्रमांक
ईमेल
(४) वय —
(५) शैक्षणिक अर्हता -
(६) व्यवसाय -
(७) प्रवर्ग —
(ज्या प्रवर्गातून नियुक्ती हवी आहे तो प्रवर्ग नमूद करावा.)
(८) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे स्वरुप -
(९) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे कार्यक्षेत्र -
(१०) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचा कालावधी.
केव्हापासून —
केव्हापर्यंत -
(११) किती ग्राहकांमध्ये जागृती निर्माण करण्यात आली व कोणत्या बाबीबद्दल ?
(१२) वरील कार्यामुळे किती ग्राहकांना नेमका काय फायदा प्रत्यक्षात झाला आहे ?
(१३) वरील कार्यात उपलब्धीच्या वैशिष्टयपूर्ण बाबी व त्याकरिता मिळालेले पुरस्कार/ पारितोषिक, इ.
(१४) आपली निवड वरील परिषदेवर झाल्यास आपले काय योगदान राहील व कशाप्रकारे ? (एका परिच्छेदात नमूद करावे.)
(१५) सोबत जोडलेले पुरावे / कागदपत्रे.

---

मी श्री / श्रीमती ............................................... प्रमाणित करतो की, अर्जात नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार खरी व बरोबर आहे. मी आणखी असे मान्य करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास खोटया माहितीच्या आधारे मिळविलेली नियुक्ती रद्द होण्यास व फौजदारी कारवाईस मी पात्र राहीन. त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहाणार नाही.

दिनांक - अर्जदाराची स्वाक्षरी

स्थळ - अर्जदाराचे नाव —

## परिशिष्ट-ब

**राज्य/जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील** अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी इच्छुक व्यक्ती/संस्थांनी खालील प्रमाणपत्रे/कागदपत्रे जोडून अर्ज सादर करणे आवश्यक आहे:-

**अ) अशासकीय संस्थेकडून नामनिर्देशित करावयाच्या प्रतिनिधींसाठी:-**

१) विहित नमुन्यातील अर्ज.

२) अर्जासोबत अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींसाठी शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या निकषांच्या अनुषंगाने केलेल्या कामाचा पुरावा म्हणून सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे..

३) गैरवर्तनासंबंधी संस्थेविरुध्द/पदाधिका-यांविरुध्द खटला दाखल होऊन शिक्षा झाली नसल्याचे संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त यांचे किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिका-याचे प्रमाणपत्र.

४) शासनाने बंदी घातलेल्या संस्था / संघटना यांच्याशी संबंधित नसल्याबद्दल जिल्हा पोलीस अधिक्षक / पोलीस आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिका-यांचे प्रमाणपत्र

५) संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत संस्थेची नोंदणी झाली असल्याचे प्रमाणपत्र व घटनेची प्रत.

६) संस्थेचे ध्येय व उद्देश.

७) संस्थेचे बँक बॅलन्स प्रमाणपत्र.

८) संस्थेचा चालू वर्षाचा अर्थसंकल्प.

९) संस्थेचे मागील तीन वर्षांचे ऑडिटेड स्टेटमेंट.

१०) संस्थेने ज्या व्यक्तीची शिफारस केली आहे, त्या व्यक्तीचे संमतीपत्र.

**ब) इतर अशासकीय सदस्यासाठी:-**

१) विहित नमुन्यातील अर्ज.

२) अर्जासोबत संबंधित व्यक्तीने ज्या प्रवर्गातील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीकरिता अर्ज केला आहे, त्यासाठी विहित केलेल्या निकषांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने केलेल्या कामाचा पुरावा म्हणून सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडाव्यात.

३) गैरवर्तनासंबंधी खटला किंवा शिक्षा झाली नसल्याचे संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त यांचे किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिका-याचे प्रमाणपत्र.